जा.क्र./मनपा/उप.अ/ 161 /२०१८ दि. 31 /0 7 /२०१८

## दरपत्रक सूचना (Close Offer) (Third Call)

मा. कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) हे खालील कामांकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांचे नोंदणीकृत पात्र ठेकेदारांकडून दरपत्रके (Close Offer) मागवीत आहेत. दरपत्रके दिनांक. 07/08/२०१८ रोजी दुपारी ०४.०० वाजे पर्यंत कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांच्या कार्यालयात स्वीकारण्यात येतील. शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यात येतील. प्राप्त दरपत्रके स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त महोदय यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा. रक्कम | १% इसारा रक्कम रु. | ठेकेदाराचा वर्ग | निविदा प्रक्रियाकिती वेळेस झाली |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ०६ अंतर्गत वार्ड क्र. ७९ न्यायनगर अंतर्गत पुंडीलकनगर चौडेश्वरी ग.नं.०१ मध्ये दुषित पाणी पुरवठा बंद करण्यासाठी १०० मि.मी व्यासाची डी.आय.के-७ जलवाहिनी टाकणे बाबत. | ४९१०९५/- | ४९११/- | १ ते ७ | ४ वेळेस ई-निविदा व दोन वेळेस Close Offer |

**अटी व शर्थी** : **(१)** दरपत्रके दोन लिफाफ्यात सादर करण्यत यावीत. पहिल्या लिफाफ्यात १% इसारा रकमेचा उपआयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या नावे राष्ट्रीयीकृत बँकेचा D.D. अथवा मनपा कार्यालयात रोख रक्कम जमा केल्याची पावती सादर करावी व लिफाफा क्र.०२ मध्ये दरपत्रक सादर करावे. **(२)** कंत्राटदारास बी-१ निविदेच्या सर्व अटी व शर्थी लागू राहतील. **(३)** सदर कामाची निविदा किंमत देयकातून वसूल केली जाईल. **(४)** कामगार कल्याण निधीची १% रक्कम देयकातून कपात करण्यात येईल. **(५)** निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दरांचा असेल तर निविदा धारकांनी निविदाधीन किमतीच्या १% एवढया किमतीची रोख रक्कम जमा केल्याची पावती किंवा डिमांड ड्राफ्ट अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit) म्हणून सादर करावा. (उदा. १% ते १०% कमी दर - १% रक्कम) निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढया जास्त दराने आहे तेवढया किमतीची रोख रक्कम जमा केल्याची पावती किंवा डिमांड ड्राफ्ट सादर करावा. (१४% कमी दर - १०% पर्यंत करीता - १% व (१४% - १०%) - ४% असे एकूण ५%). **(६)** कंत्राटदार ज्या कामांसाठी दरपत्रक देणार आह, त्या कामाचा स्पष्ट उल्लेख बंद लिफाफ्यावर करण्यात यावा. **(७)** वरील कामांपैकी रस्ते कॉंक्रिटीकरण करण्याच्या कामासाठी दोष व दाईत्व कालावधी (D.L.P) **५ वर्षाचा** राहील तसेच इतर कामांसाठी दोष व दाईत्व कालावधी तीन वर्षाचा राहील. **(८)** निधी उपलब्धतेनुसार देयक अदाई करण्यात येईल. **(९)** दरपत्रकात दर अंकात व अक्षरी स्पष्ट लिहावे. **(१०)** पाईप खरेदीचे बिल व उत्पादक कंपनीचा टेस्ट रिपोर्ट सादर करणे बंधनकारक आहे. **(११)** काम सुरु असतांना कामाची छायाचित्रे घेणे बंधनकारक आहे. **(१२)** काम सुरु असतांना सुरक्षेच्या दुष्टीने करावयाच्या उपाययोजना राबविणे, वाहतूकीस अडथळा होणार नाही या बाबतीत दक्षता घेणे बंधनकारक आहे. **(१३)** सदरील कामांसाठी तिन महिने मुदत आहे. **(१४)** महानगरपालिकेने वेळोवेळी केलेल्या बदलांची / सूचनांची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. **(१५)** मागील सात वर्षा मध्ये कंत्राटदाराने याच स्वरुपाचे - (i) निविदा किमतीच्या ४०% किमती एवढ्या रकमेची किमान तीन कामे किंवा. (ii) निविदा किमतीच्या ६०% किमती एवढ्या रकमेची किमान दोन कामे किंवा. (iii) निविदा किमतीच्या ८०% किमती एवढ्या रकमेचे किमान एक काम **जून २०१८** पर्यंत समाधानकारक रित्या पुर्ण केलेले असले पाहिजे. काम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. **(१६)** कंत्राटदारास जी.एस.टी. नोदणी बंधनकारक असुन निविदा धारकाने जी.एस.टी. नोंदणी प्रमाण पत्र अपलोड करावे.

**कार्यकारी अभियंता**
महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत :

१. सिस्टीम मॅनेजर यांनी मनपाच्या वेबसाईट वर प्रसिध्दी दयावी.

२. जनसंपर्क अधिकारी यांनी सदर दरपत्रक सुचना वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करावी.